सं. फौ. खटला क्र. ३०३ /२०२६

CNR. No. MHRG/090003972026 महाराष्ट्र शासन वि. भरत किसन महाडिक
नि.क्र. २ /ब

रोहा येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, रोहा जिल्हा रायगड यांच्या न्यायालयात
(पिठासीन अधिकारी श्री एस.व्ही.खैरे)

| | | |
|---|---|---|
| १ | गुन्हा घडल्याची तारीख | १२/०२/२०२६ |
| २ | प्रथम माहिती अहवाल व पोलीस ठाणे | नागोठणे पोलीस स्टेशन गु.र.नं. ३०/२०२६ |
| ३ | प्रथम माहिती अहवाल दाखल दिनांक | १२/०२/२०२६ |
| ४ | फिर्यादी/अहवाल देणार | दिपाली आशिर्वाद पाटील मपोह/२०५ नागोठणे पोलीस ठाणे |
| ५ | आरोपीचे नाव, वय व पत्ता | भरत किसन महाडिक<br>वय– ३२ वर्षे,<br>रा. ध्यारी ता. रोहा<br>जि. रायगड |

६ आरोपीस सांगावयाचे अपराधाचे विवरण –

तुम्ही दि. १२/०२/२०२६ रोजी ११.१५ वा च्या सुमारास या न्यायालयाचे स्थळसिमेत, मौजे नागोठणे बाजारपेठेतील वाफना ज्वेलर्स समोरील सार्वजनिक रोडवर तुम्ही तुमचे ताब्यातील टेम्पो गाडी क्रमांक MH-06-AR-3824 हे वाहन सार्वजनिक वाहतूकीस अडथळा व धोका निर्माण होईल अशा रितीने उभे केले असतांना आढळून आले व त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८५ अन्वये गुन्हा केला आहे.

आणि मी याद्वारे तुमच्याविरुध्द वरील गुन्हयाकरीता खटला चालवण्याचे निर्देश देतो.
आरोपीला अपराधाचे विवरण त्याच्या भाषेत वाचून व समजावून सांगीतले.

७ आरोपीचे प्रतिकथन –

१. तुम्हाला आरोपपत्र व संपूर्ण कागदपत्रांच्या नकला मिळाल्या आहेत काय?
उत्तर– होय.
२. तुम्हाला समजावून सांगीतलेला उपरोक्त गुन्हयाचा तपशील समजला आहे काय?
उत्तर– होय.
३. तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय?
उत्तर– मला गुन्हा कबुल आहे.

B. K. Mahadik
आरोपीची सही/अंगठा

स्थळ : रोहा.
दिनांक – ०४ /०३ /२०२६.

(एस.व्ही.खैरे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, रोहा.

**न्यायनिर्णय**

८ सदर आरोपीविरूध्द भारतीय न्याय संहिता कलम २८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आज रोजी आरोपीने न्यायालयात सदर प्रकरणात स्वच्छेने गुन्हा कबुल करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. गुन्हा कबुल केल्याबाबतची पुरशिस आरोपीने निशाणी क्र. २ वर दाखल केली आहे. आरोपीला गुन्हा कबुल केल्यानंतर होणा–या परिणामाची जाणीव करून देण्यात आली. त्यानंतर देखील आरोपीने स्वमर्जीने गुन्हा कबुल केला आहे. वरील प्राप्त परिस्थती लक्षात घेतली असता, सरकार पक्षाची तक्रारमधील कथने निर्विवादपणे सिद्ध झालेली आहेत. त्यामुळे आरोपीला सदर गुन्हाकरिता दोषी धरण्यात येत आहे. आरोपीने दया दाखविणेस विनंती केली आहे. त्याने नमुद केली की, तो घरातील एकमेव कमविता व्यक्ती आहे. आरोपीने केलेली विनंती, आरोपीचे वय, गुन्हाचे स्वरूप लक्षात घेता, आरोपीला द्रव्यदंडाची शिक्षा देणे न्यायोचित होईल, करिता खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

**आदेश**

१. आरोपीला भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७५ प्रमाणे भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम **२८५** अन्वये दंडनीय गुन्ह्याकरीता दोषी धरण्यात येते.

२.आरोपीला भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम **२८५** अन्वये दंडनीय गुन्हयाकरीता रक्कम रूपये ५००/– (अक्षरी रक्कम रूपये पाचशे मात्र) द्रव्य दंडाची शिक्षा ठोठावण्यात येते. आरोपीने द्रव्य दंडाची रक्कम भरण्यास कसूर केल्यास पाच दिवसांची साधी कैद सुनावण्यात येते.

(एस.व्ही.खैरे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, रोहा

स्थळ : रोहा.
दिनांक – ९८ / ०३ /२०२६.

Received Fine Amount of Rs. 500/–
(Rs. Five Hundred only)
14/03/2026
1128
सहायक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
रोहा, ता.रोहा, जि.रायगड